**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात वीजदरात टप्प्याटप्प्यानं ५ वर्षात २६ टक्के कपात होणार, पहिल्या वर्षी १० टक्के कपात, सुधारित दर येत्या १ जुलैपासून लागू

- राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारपासून १८ जुलैपर्यंत

- राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या १५१व्या जयंतीनिमित्त राज्यभरात व्याख्यानं, समता दिंडी, अशा विविध कार्यक्रमांनी त्यांना अभिवादन

- नासाच्या ॲक्सिओम फोर या मोहिमेअंतर्गत शुभांशु शुक्ला यांच्यासह ४ अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात दाखल

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे १ हजार अंकांची वाढ

**<><><><>**

राज्यात प्रथमच वीजग्राहकांना दरकपात मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. वीजदरकपात करण्यासाठी महावितरणनं केलेल्या याचिकेवर राज्य वीज नियामक आयोगानं दिलेल्या निकालानुसार टप्प्याटप्प्यानं ५ वर्षात २६ टक्के कपात वीजदरात केली जाईल. सुधारित दर येत्या १ जुलैपासून लागू होणार असून पहिल्या वर्षी १० टक्के कपात होणार आहे.भविष्यातल्या वीज खरेदीत सौर ऊर्जा आणि हरित ऊर्जेवर भर दिल्यामुळे वीजखर्चात बचत होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

दरमहा १०० युनिटपेक्षा कमी वापर करणाऱ्या ग्राहकांना दरकपातीचा जास्त फायदा होईल. औद्योगिक वापरासाठीचा दर सध्या १० रुपये ८८ पैसे आहे तो पाच वर्षांत ९ रुपये ९७ पैशांपर्यंत कमी होईल. व्यापारी दर १६ रुपये ९७ पैशांवरुन पाच वर्षांत १५ रुपये ८७ पैसे होईल, असं ते म्हणाले.

राज्यात शिक्षणात पहिली ते पाचवीपर्यंत हिंदीची सक्ती नाही, आणि मराठी भाषा अनिवार्य आहे असं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

दरम्यान, हिंदी सक्तीच्या विरोधात येत्या ५ जुलै रोजी मुंबईत गिरगाव चौपाटीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना मोर्चा काढणार असल्याचं अध्यक्ष राज ठाकरे यांनी जाहीर केलं आहे.

**<><><><>**

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारपासून मुंबईत सुरु होणार आहे. १८ जुलैपर्यंत हे अधिवेशन चालेल. विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. या बैठकीला दोन्ही सभागृहांचे पीठासीन अधिकारी, विरोधी पभनेते, मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातले काही सदस्य, सल्लागार समिताचे इतर सदस्य उपस्थित होते. बैठकीत अधिवेशनाच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली.

**<><><><>**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त त्यांना आज राज्यभरात अभिवादन करण्यात येत आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवनात छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्यांच्या वर्षा निवासस्थानी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करत आदरांजली वाहिली. शाहू महाराजांनी सर्वसामान्य बहुजन समाजाला नवीन जीवन दिलं. ते गरीब, शोषित आणि वंचितांचे कैवारी होते अशा शब्दांत शिंदे यांनी अभिवादन केलं.

विकासाची दूरदृष्टी बाळगणाऱ्या लोककल्याणकारी राजांच्या कार्याला आणि स्मृतींना वंदन! अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समाज माध्यमावर पोस्ट करत आदरांजली वाहिली.

कोल्हापूरमध्ये शाहू महाराजांची जयंती ‘सामाजिक न्याय दिन’ म्हणून साजरी करण्यात आली. यानिमित्तानं जिल्हा प्रशासन आणि सहायक आयुक्त समाजकल्याण विभागातर्फे दसरा चौकात समता दिंडीसह विविध कार्यक्रम आयोजित केले होते. समता दिंडीचे उद्घाटन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, खासदार शाहू महाराज छत्रपती, आमदार जयंत आसगावकर, जिल्हाधिकारी

अमोल येडगे उपस्थित होते. समता दिंडीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था,  शाळा, महाविद्यालयं, सामाजिक न्याय विभाग अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.

सांगली जिल्ह्यात शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्तानं व्याख्यानं, समता दिंडी आणि चित्ररथ, संविधान जनजागृती कार्यक्रम झाले.

सोलापूर, नांदेड, धुळे जिल्ह्यांतही शाहू महाराजांच्या जयंतीच्या निमित्तानं विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><>**

चीनच्या किंगदाओ इथं झालेल्या SCO  शांघाय सहकार्य संघटनेच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत भारतानं संयुक्त जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करायला नकार दिला आहे. घोषणापत्रात सीमापार दहशतवादी कारवायांचा उल्लेख नसल्यानं भारतानं नाराजी व्यक्त करत स्वाक्षरी करण्यास नकार दिला. दहशतवाद, कट्टरतावाद आणि उग्रवाद हे प्रादेशिक शांतता आणि परस्पर विश्वासासाठी सर्वात मोठे धोके असल्याचं  संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या बैठकीत सांगितलं.

**<><><>**

पालघर जिल्ह्यातल्या देहरजी धऱणानं ५ पूर्णांक १४७ दशलक्ष घनमीटरची पातळी गाठली असून धरण एकूण साठवण क्षमतेच्या ५ टक्के भरलं आहे. धरणात पाणी साठण्याची ही पहिलीच वेळ होती.

**<><><>**

नासाच्या ॲक्सिओम फोर या मोहिमेअंतर्गत भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्यासह ४ अंतराळवीरांना घेऊन निघालेलं स्पेसएक्स ड्रॅगन हे अंतराळयान आज दुपारी ४ वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचलं. त्यामुळे शुभांशु हे १९८४मध्ये राकेश शर्मा यांच्यानंतर अंतराळात जाणारे दुसरे तर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचणारे पहिले भारतीय ठरले आहेत. शुक्ला या मोहिमेदरम्यान सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाशी संबंधित सात प्रयोग करतील. यात किरणोत्साराचा शैवालांवर होणारा परिणाम, अवकाशात बियाणं पेरणं अशा विविध प्रकारच्या प्रयोगांचा समावेश आहे.

या मोहिमेचं नेतृत्व अमेरिकेचे कमांडर पेगी व्हिटसन करत आहेत.

**<><><><>**

पश्चिम आशियातली भूराजकीय स्थिती निवळल्याचे थेट परिणाम आज देशांतर्गत शेअर बाजारांवर पाहायला मिळाले. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर १ हजार अंकांची वाढ झाली आणि तो ८३ हजार ७५६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३०४ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ५४९ अंकांवर बंद झाला.

सेन्सेक्समध्ये नोंदणीकृत असलेल्या ३० पैकी २३ कंपन्यांच्या शेअरमध्ये आज वाढ पाहायला मिळाली. धातू, गॅस आणि इंधन, उर्जा अशा क्षेत्रांमधले शेअर आज वाढले. तर आयटी, बँकिंग आणि ऑटोमोबाईल क्षेत्रातल्या काही कंपन्यांच्या शेअरमध्ये घसरण झाली.

**<><><><>**

दुचाकी वाहनांची संपूर्ण टोलमुक्ती सुरू राहील, असं रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी स्पष्ट केलं. दुचाकींवर टोल लादण्यात येणार असल्याचा कोणताही निर्णय प्रस्तावित नसून काही प्रसारमाध्यमांनी यासंदर्भा प्रसारित केलेलं वृत्त दिशाभूल करणारं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

राज्यात गेल्या चोवीस तासांत सर्वदूर पाऊस पडला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे २५ जून २०२५पर्यंत मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावांमध्ये ३५ पूर्णांक २ शतांश टक्के इतका पाणीसाठा झाला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी ५ पूर्णांक २९ शतांश टक्के इतका पाणीसाठा होता, त्या तुलनेने यंदा पाणीसाठ्यात सात पटीने वाढ झाली आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात महिनाभरापासून पडत असलेल्या पावसामुळे जिल्ह्यातली २८ धरणं १०० टक्के भरली असून २८ धरणांमध्ये ५० टक्क्यांहून अधिक पाणीसाठा झाल्याची माहिती जिल्ह्याच्या पाटबंधारे मंडळाने आपल्या अहवालात दिली आहे.

**नांदेड** जिल्ह्यात गेल्या २४ तासांत ६० पूर्णांक ३० शतांश मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. **अकोला** जिल्ह्यात आतापर्यंत चांगला पाऊस झाला असून काल दिवसभरात ६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. येत्या २९ जूनपर्यंत जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे. **वाशिम** जिल्ह्यात मंगरूळपीरसह जवळपास सर्वच जिल्ह्यात काल संध्याकाळपासून सुरू

असलेल्या संततधार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आले असून शेकडो हेक्टरवर पेरलेलं बियाणंही वाहून गेलं आहे. **धुळे शहर** आणि जिल्ह्यातल्या बहुतांश भागात आज दुपारपासून पावसाला सुरुवात झाली आहे. **जालना** जिल्ह्यातही आज पहाटेपासून पावसाची संततधार सुरू आहे.

**<><><><>**

कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी, आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी काल पाऊस पडला. विदर्भात तुरळक ठिकाणी अतिवृष्टी झाली.

विदर्भात काही ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. याच काळात कोकण किनाऱ्यावर सोसाट्याचे वारे वाहण्याचीही शक्यता आहे.

**//<><><><>//**